Impact Factor 6.261 ISSN- 2348-7143

INTERNATIONAL RESEARCH FELLOW ASSOCIATION'S

# RESEARCH JOURNEY

UGC Approved Multidiciplinary international E-research journal

PEER REFREED & INDEXED JOURNAL

18th Feb. 2019 Special Issue- 130 ( I )

# THE ROLE OF GOVERNMENT TO PROTECT THE HUMAN RIGHTS

Chief Editor
Dr. Dhanraj T. Dhangar
Assist. Prof. (Marathi)
MGV'S Arts & Commerce college,
Yeola, Dist. Nashik (M.s.) India

Executive Editor of This Issue
Dr. Vanmala Govindrao Gundre
Principal
Yashwantrao Chavan College, Ambajogai. Dist. Beed.

Co-Editor
Dr. Ahilya Barure
Dr. D.R. Tandale
Dr. D.B. Tanduljekar

RESEARCH JOURNEY

Scanned with CamScanner

19. स्त्रियांचे प्रश्न आणि मानवी हक्क 65
**प्रा.डॉ. देशमुख रुपेश नानासाहेब**

20. मानवी अधिकार आणि भारतीय राज्यघटना 68
**प्रा.डॉ. दिवाण शिवाजी गोविंदराव**

21. भारतातील मागासवर्ग आणि मानवी हक्क 70
**प्रा.डॉ.बी.एम.नरवाडे**

22. मानवी हक्क आणि महिला 73
**डॉ.मेघा एस. पाठक (दिग्रसकर)**

23. मुलभूत हक्कातील शिक्षण: एक दृष्टीक्षेप 75
**प्रा.डॉ.रुद्देवाड बी.पी.**

24. मानवाधिकार आणि बालविकासाच्या समस्या : एक समाजशास्त्रीय अभ्यास 77
**प्रा.अनिल गाडेकर**

25. मानवी हक्क आणि महिला विकास 79
**आबासाहेब आर.कसबे**

26. मानवाधिकार आणि स्त्रियांची स्थिती 81
**प्रा. सुरेंद्र हरिभाऊ किन्हीकर**

27. मानवी अधिकारांचे प्रकार 84
**प्रा. आर.डी.खताळ**

28. महाराष्ट्रातील मानव अधिकार : विशेष संदर्भ रोजगार व दारिद्र्य 86
**प्रा. डॉ. अनिल दत्तू देशमुख**

29. भारतीय राज्यघटनेतील मानवी हक्क 90
**डॉ. प्रशांत भाऊसाहेब सोळंके**

30. भारतीय संविधान आणि मानव अधिकार 92
**प्रा. राजाराम नामदेव निगडे**

31. मानवी हक्क आणि महिला सक्षमीकरण 94
**डॉ.दीपक एम.भारती , मेघराज जनार्धन मोरे**

32. भारतीय राज्यघटना व मानवाधिकार 97
**डॉ.आरडले एस.डी.**

33. भारतातील दलित चळवळ आणि मानवी हक्क विषयक तरतुदी 99
**प्रा.डॉ अजय पाटील**

34. भारतातील बालकामगार विषयक समस्या व कायदे 102
**प्रा.डॉ किशोर गटकळ**

35. स्त्री हिंसाचार : एक आव्हाण 105
**प्रा. सय्यद आर. आर.**

36. मानवी हक्क व महिला 107
**प्रा. संध्या पेंडकर / देशपांडे**

37. मानवी हक्क आणि भारतीय महिला. 111



Scanned with CamScanner

RESEARCH JOURNEY International Multidisciplinary E-Research Journal | ISSN-2348-
Impact Factor - (SJIF) – 6.261, (CIF) - 3.452, (GIF) – 0.676 Special Issue – 130 (I) | January 2019 | UGC Appr No. 407
The Role of Government to protect the Human Rights

# स्त्रियांचे प्रश्न आणि मानवी हक्क

**प्रा.डॉ. देशमुख रुपेश नानासाहेब**
लोकप्रशासन विभाग, यशवंतराव चव्हाण महाविद्यालय, अंबाजोगाई

---

भारताला स्वातंत्र्य मिळून 71 वर्षे पूण झाली असताना सुध्दा स्वातंत्र्याचे फायदे भारतीय समाजातील महिलासारखा एक मोठा घटक अद्यापही पू उपभोग शकत नाही. प्राचीन काळापासून पुरूषप्रधान समाजात स्त्रियांना दुय्यम स्थान दिले गेले आहे. स्त्रियाकडे एक भोग वस्तू म्हणूनच पाह समाजाचा दृष्टीकोन होता. फक्त चूल आणि मूल एवढ्यापुरतेच तिचे कार्यक्षेत्र समाजाने ठरवून दिले होते. समाजातील अनेक सामाजिक रुढी, पर तिला बंदीस्त करुन ठेवले होते, असे असताना सुध्दा प्राचीन काळातील गार्भी, मैत्रेयी सारख्या स्त्रियांपासून राजमाता जिजाऊ, राणी लक्ष्मी सावित्रीबाई फुले पर्यंत अनेकांनी आपल्या कतृर्त्वाची चुणूक जगाला दाखवून दिली.

आज प्रत्येक क्षेत्रात पुरूषांच्या बरोबरीने स्त्रिया काम करित आहेत. राजकारणात इंदिरा गांधी, प्रतिभाताई पाटील, वैज्ञानिक क्षेत्रात-क चावला, सुनिता विल्यम, संगीत क्षेत्रात-लता मंगेशकर, आशा भोसले. प्रशासनाम्त-किरण बेदी, क्रिडा क्षेत्रात-पी.टी.उषा, तेजस्विनी सावंत, स वेहवाल इ. आज असे एकही क्षेत्र नाही की जे स्त्रीला वर्ज्य आहे. प्रत्येक क्षेत्रात स्त्रीने आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटविला आहे. असे असूनही क्षेत्रात स्त्रियांच्या हक्काची पायमल्ली होत असल्याचे दिसून येते.

20 व्या शतकाच्या पूर्वार्धात जगाला दोन महायुध्दाचा सामना करावा लागला या दोन्ही महायुध्दामध्ये झालेल्या प्रचंड जिवित आणि वित्त आंतरराष्ट्रीय समुदायाला आत्मपरीक्षण करण्यास प्रवृत्त केले. या महायुध्ददरम्यान जर्मनीमध्ये हिटलरच्या काळात वंशाच्या आधारावर लाखो लोकांच्या कत्तली झाल्या. कत्तलीने जगाला हादरवून टाक्ले. हे हत्याकांड मानवी संस्कृतीच्या इतिहासात सर्वात क्रूर हत्याकांड म्हणून ओळखले जाते असत्ले तरी या हत्याकांडाने आंतरराष्ट्रीय कायद्याचा भंग केला नव्हता, कारण तो देशांतर्गत राजकारणाचा भाग होता. परंतु अशा स्वरुपाच्या घट नियंत्रण ठेवण्यासाठी आंतरराष्ट्रीय कायद्यामध्ये विशेष तरतूद करण्याचे ठरवून मानवी अधिकाराच्या संहितीकरणाचा पाया घातला. सर्व राष्ट्रांनी मान अधिकाराचा आधार राखून त्याच्या संरक्षणेसाठी आपल्या राज्यघटनामधून कायदेशीर तरतुद करावी या दिशेने महत्वाचे पाऊल टाकून 10 डिसें 1948 रोजी संयुक्त राष्ट्रसंघटनेच्या महासभेने प्रसिध्द केलेल्या मानवी हक्काचा जाहीरनामा यात एकूण 30 मानवी हक्कांचा समावेश करून मान हाच धर्म मानला आहे.

प्रस्तुत लेखात मानवी हक्क आणि वेगवेगळ्या क्षेत्रात स्त्रीयंना भेडसावणारे प्रश्न यांचा उहाडोह करण्याचा प्रयत्न केला आहे.

**मानवी हक्कांचा अर्थ :-**

मानव अधिकार म्हणजे नैसर्गिक अधिकाराचे धर्मनिरपेक्ष रुप आहे. सतराच्या शतकापासून यरोपमध्ये नैसर्गिक अधिकारांना दैवी अधिकार म्हणून संबोधले जात होते. 20 शतकामध्ये मानव अधिकारांचे धार्मिक अधिष्ठान मागे पडले आणि या अधिकारांना, कायद्याचे संरक्षण प्राप्त झाल्यानंतर अधिकार पुढे मानव अधिकार म्हणून ओळखले जाऊ लागले. अशा प्रकारे मानव अधिकारांचा प्रास नैसर्गिक अधिकार-दैवी अधिकार-कायदेशीर अधिकार-नागरी स्वातंत्रे आणि मानव अधिकार अशा स्वरुपात झालेला दिसून येतो.

मानवी हक्क हे व्यक्तीला सन्मानपर्वक जगण्यासाठी, त्यांच्या व्यक्तीमत्वाच्या विकासासाठी, इतर व्यक्तीपासून, राज्याच्या अधिकाराच्या हिंसाचारापासून स्वत:चे संरक्षण करण्यासाठी प्राप्त झालेले संरक्षण कवच आहे.

- माणसाला माणूस म्हणून जगू देण्याचा हक्क म्हणजे मानवी हक्क होय.
- जगातील प्रत्येक व्यक्तीला ती व्यक्ती फक्त एक मानव आहे या एकाच कारणाने ज्या हक्कांची प्राप्ती होणे आवश्यक आहे असे हक्क म्हणजे मानवी हक्क होय.
- प्रा.लास्कीच्या मते-ज्या सामाजिक परिवर्तनाशिवाय व्यक्तीला सर्वसाधारणपणे स्वत:ची जास्तीत जास्त प्रगती घडवून आणता येणार नाही अ परिस्थितीच्या घटकांचा मानवी हक्क म्हणतात.
- मॉरिस क्रॅटसनच्या मते मानवाधिकार हे स्वातंत्र्याचे सर्वोच्च आणि पवित्र अधिकार असून त्यांचे उल्लंघन राज्याला करता येणार नाही.

**मानवी हक्क विषयक जागतिक घोषणापत्र :-**

मानवी सत्माजाची निर्मिती झाल्यापासून मानवी हक्काच्या प्रगतीसाठी मानवाच्या संघर्षास प्रारंभ झाला.लोकशाही व मुल्याच्या उदयानंतर मानवी हक्क संकल्पना प्रत्यक्षात येण्याची चिन्हे दिसू लागली. मानवी समाजास सूखी, आनंद्दी, भयमुक्त जीवन जगण्यासाठी मानवी हक्काच्या संरक्षणार्थ संयुक्त राष्ट्र संघटनेच्या घोषणापत्रास अनुसरून 1946 मध्ये श्रीमती एलिनर रूझवेल्ट यांच्या अध्यक्षतेखाली मानवाधिकार आयोगाची स्थापना करण्यात आली. या आयोगाकडे चार जबाबदाऱ्या सोपवण्यात आल्या. 1. मानवी हक्काविषयाचा आंतराष्ट्रीय जाहीरनामा तयार करणे 2. नागरी स्वातंत्र्य महिला विषयीच्या अधिकाराचा मसुदा तयार करणे.3. अल्पसंख्यांकाचे संरक्षण करणे 4.वंश, धर्म, भाषा, लिंग या आधारावर विषमता, भेदभाव करणे.1948 मध्ये आयोगाने मानवाधिकार घोषणापत्राचे प्रारुप महासभेकडे सोपवले.महासभेने 10डिसेंबर 1948 ला त्याचा स्विकार करून ते घोषित केले.या मानवी हक्काच्या जाहीरनाम्यात 30 कलमे समाविष्ट केली असून या जाहीरनाम्याची सुरूवात ऑल ह्युमन बिइंग आर बॉन वीथ इक्वल इनअलायनेबल राईटस ॲन्ड फन्डामेंटल फ्रिडन्स या वाक्याने झाली आहे. सर्व माणसे जन्मत:च समान आहेत आणि त्यांना अधिकार व मूलभूत स्वातंत्र्य प्राप्त झाली आहेत, भारतीय घटनेच्या सरनाम्यामध्ये (प्रास्ताविक)स्वातंत्र्य, समता, न्याय, बंधुता, ह्या चतु:सूत्रीचा उल्लेख करण्यात आला असून प्रत्येक भारतीय व्यक्तीला वरील अधिकार मिळाले पाहिजेत, यावर भारतीय घटना भर देताना आढळते. असे असले तरी या मानवी हक्कांची उघड-उघड पायमल्ली होत असताना आपणां दिसते.

| RESEARCH JOURNEY International Multidisciplinary E-Research Journal | | ISSN- 2348-7143 |
|---|---|---|
| Impact Factor - (SJIF) – 6.261, (CIF ) - 3.452, (GIF) –0.676 Special Issue – 130 (I) The Role of Government to protect the Human Rights | January 2019 | UGC Approved No. 40705 |

**मानवी हक्क आणि स्त्रीयांचे प्रश्न :-**

आज जगात सर्वात जास्त अन्याय अत्याचार स्त्रीयांवर होत आहेत. आज समाजामध्ये स्त्रियांच्या सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक, राजकीय हक्काचे उल्लंघन होताना दिसून येत. याचे प्रमाण कमी न होता ते दिवसेंदिवस वाढत चाललेले आहे. याला कारणीभूत कुटूंब, समाज आणि प्रशासन आहे.वंशाचा दिवा म्हणून मुलाकडे मुलाकडे पाहण्याच्या वृत्तीमुळे स्त्री भ्रूण हत्या मोठ्या प्रमाणावर होत आहेत. बालविवाहामुळे कमी वयात माता बनल्यामुळे मुलीच्या आरोग्यावर विपरित परिणाम होतात, तसेच हुंडा प्रथा, देवदाशी प्रथा, अंधश्रध्दा यामुळे स्त्रियांचा शारिरीक व मानसिक छळ केला जातो.त्यामुळे प्रत्येक क्षेत्रातील महिलांच्या समोर वेगवेगळ्या स्वरुपाचे प्रश्न उभे असलेले दिसतात.पुरूष प्रधान संस्कृतीमध्ये पुरूषांचाच वरचष्मा आहे. त्यामुळे स्त्रियांना वेगवेगळ्या प्रकारच्या अन्याय, अत्याचारांना सामोरे जावे लागते.म्हणजे वैवाहिक, हिंसाचार, हुंडाबळी, बलात्कार, सक्तीने केला जाणारा महिला व्यापार, शारिरीक, मानसिक छळ अशा अनेक सामाजिक समस्यांना स्त्रीयांना सामोरेजावे लागत आहे.कुटूंबामध्ये मारहाण करणे ही सर्व सामान्य गोष्ट मानली जाते. कौटुंबिक अत्याचारामध्ये 40 टक्के महिला केवळ मारणे, हल्ला करणे, जाळणे, शिवीगाह करणे, अपमान करणे अशा त्रासांना बळी पडतात किंवा अशा त्रासास कंटाळून आत्महत्या करतात. तसेच जेव्हा पती व पत्नी दोघेही प्रशासकीय सेवेत असतात. तेव्हा पतनीला मासिक वेतन उचलण्याचा हक्क असतो. परंतु स्वत:च्या मर्जीनुसार पैसा खर्च करण्याचा हक्क नाकारून मानवी हक्काची पायमल्ली केली जाते. प्रशासन व्यवस्थेतील महिलांना तर विनाकारण उशिरापर्यंत कार्यालयात थांबवून त्यांचे मानसिकदृष्ट्या खच्चीकरण करण्याचा प्रयत्न होतो. महिलांच्या भावनाप्रधान स्वभावाचा गैरफायदा घेतला जातो. यातच अश्लिश चित्रे दाखवणे, अश्लिल हावभाव करणे, विकृत दृष्टीने पाहून त्यांच्या मानवी हक्काची पायमल्ली केली जाते.

स्त्रीयांच्या राजकीय क्षेत्राबाबतीतही वेगळ्या समस्या आहेत. म्हणजे राजकीय सहभागात भेदभावाचे प्रकार दिसून येतात. निवडणूक प्रक्रियेत उमेदवार असलेल्या आणि प्रतिनिधीत्व प्राप्त केलेल्या स्त्रीयांना सर्वच राजकीय पक्ष पुढे न येऊ देण्याचे कार्य करतात. ज्या महिला प्रतिनिधी आहेत त्यांना पक्षाच्या आदेशानसार प्रश्न मांडावे लागतात, कारण राजकारणात स्त्रीया सक्षम होतील ही भिती पूरूष मंडळींना असते. जर त्या सक्षम झाल्या तर आपले सीन दुय्यम होईल या भितीने त्यांच्या राजकीय हक्काची पुरूष मंडळींकडून पायमल्ली केली जाते.

स्त्रीयांच्या आरोग्य विषयक समस्या ही अनेक भयावह असलेल्या दिसतात. त्यामुळे भारतीय स्त्रीयांचे आयुर्मान 58 वर्षे एवढेच आहे, तर विकसीत राष्ट्रातील स्त्रियांचे आयुर्मान 78 ते 80 वर्षे एवढे आहे. भारतीय स्त्रीयांच्या साक्षरतेचा विचार करता 1991 च्या जणगणनेनुसार एकूण स्त्रियांपैकी निरक्षर स्त्रियांचे प्रमाण 60 % आहे, तर पुरूषांमध्ये 25 % आहे. स्त्रियांच्या निरक्षरतेचे प्रमाण अमेरिकेत 3% , फ्रान्समध्ये 4% तर हंगेरीत 5 % आहे. याचा अर्थ जर पहिलीत 100 मुलींनी प्रवेश घेतला तर केवळ 61 मुली सहाव्या इयत्तेत जातात, 43 मुली नववीच्या वर्गात जातात तर 11 वीच्या वर्गात केवळ 25 मुली आलेल्या असतात. ही दिवसेंदिवस घटत जाणारी संख्या म्हणजे एक प्रकारचे स्त्रियांचे समोरील गंभीर समस्येचेच द्योतक आहे. भारतातील ग्रामीण महिलांच्या संदर्भातील केलेल्या सर्वेक्षणानूसार प्रत्येक 54 मिनीटाला एक महिला बलात्कार व दर 43 मिनीटाला एक महिला अपहरण होते. महिन्याला 800 तर वर्षभरामध्ये 9600 महिला बळी पडतात.18 वर्षाखालील मुलींचे लैंगिक शोषण केले जाते, त्यांना बालवेश्या बनवले जाते.

आजही बऱ्याच ठिकाणी चोरुन गर्भलिंग तपासणी वंशाचा दिवा म्हणून मुलगाच हवा म्हणून मुलगी जन्माला येण्याअगोदरच मातेच्या गर्भातच त्या चिमुकल्या जिवाला डोळे उघडण्याचे आधीच ते बंद करायला लावले जाते. 2011 च्या जणगणनेनूसार असमान लिंग गुणात्तर ही एक गंभीर सामाजिक समस्या म्हणून भारताच्या पुढे येत आहे. भारतात एक हजार पुरूषामागे स्त्रियांचे प्रमाण 914 इतके आहे.तर महाराष्ट्राच्या संदर्भात विचार केल्यास 2011 च्या जणगणनेनूसार दर हजारी पुरूषामागे 883 इतके कमी आहे. प्रत्येक क्षेत्रात महिलांना सहानुभूती न दाखवता त्यांना माणूस म्हणून जगण्याचा हक्क सर्व पुरूषांना दिला पाहिजे. महिलांच्या मानवी हक्काचे संरक्षण होण्यासाठी पुरूषांनीही मानसिकता बदलली पाहिजे.

**स्त्रियांच्या हक्काविषयी आंतरराष्ट्रीय पातळीवर करण्यात आलेले फायदे :-**

1. संयुक्त राष्ट्राच्या सनदेत लिंग समानतेचा आग्रह
2. महिला आयोगाची स्थापना करण्यात आली - 1946
3. महिला राजकीय हक्काचा ठराव - 1952
4. विवाहित महिलांच्या राष्ट्रीयत्वा संबंधी ठराव - 1957
5. भेदभाव निर्मूलन करण्यासंबंधीचा जाहीरनामा संमत - 1979
6. आंतरराष्ट्रीय महिला वर्ष - 1975

**महिला विषयक फायदे :-**

1. अनैतिक व्यापारबंदी कायदा - 1966(दुरूस्तीसह 1986)
2. हुंडाबळी कायदा 1961 (दुरूस्तीसह 1986)
3. स्त्री असभ्य प्रदर्शन प्रतिबंध कायदा -1986
4. राष्ट्रीय महिला आयोग कायदा -1990
5. कौटुंबिक हिंसेपासून स्त्रियांचे संरक्षण विषयक कायदा -2005
6. बालविवाह बंदी कायदा -2008

**सारांश :-**

आंतरराष्ट्रीय पातळीवर मानवी हक्काच्या माध्यमातून स्त्री पुरूष समानतेवर आधारित व्यवस्था निर्माण केल्याने केवळ प्रश्नमार्गी लागणार नाहीत तर त्याची योग्य व काटेकोर अंमलबजावणी होणे आवश्यक आहे. स्त्रीयांचे सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक, राजकीय प्रश्न जाणून त्याविषयी उपायांची अंमलबजावणी तात्काळ करून योग्य तहेने मूल्यमापन करावे. स्त्रीयांचे होणारे शोषण थांबण्यासाठी त्यांना अधिकाअधिक स्वयंरोजगार उपलब्ध करून



Scanned with CamScanner